
05-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/04/2025 11:30 PM Page 1



चार हजार गोमंतकीयांना रोजगार उपलब्ध होणार पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



टीम इंडियाची फायनलमध्ये धडक पान ४ वर

वेर्णा, बुधवार, ५ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 181 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 5 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# स्थानांतरीत वटवृक्षाचा अखेर मृत्यू!

## मुळांमधून अंकूर फुटत असल्याने आशा शिल्लक

टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ४ : पर्यावरणप्रेमींनी तीव्र विरोध केला असतानाही, स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कामांमुळे सांतइनेज येथून कांपाल येथे स्थलांतरित करण्यात आलेला २०० वर्षे जुना वटवृक्ष आता मृतवत झाला आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये कांपाल येथील फुटबॉल मैदानाच्या परिसरात स्थलांतरित केलेल्या या वृक्षाने आता आपले प्राण टाकले असले, तरी त्याच्या मुळांमधून तुरळक प्रमाणात एखादा अंकुर फुटत असल्याने काही प्रमाणात आशेचा किरण दिसत आहे.**



प्रसिद्ध भूदृश्य तज्ज्ञ डॅनियल डिसोझा यांनी वृक्षाच्या सध्याच्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, हा वटवृक्ष चांगल्या उद्देशाने स्थलांतरित करण्यात आला होता , मात्र स्थलांतराच्या प्रक्रियेत अनेक अडथळे आले. झाड आधी एका ठिकाणी लावण्यात आले, मात्र तिथे मंदिर असल्याने पुन्हा त्याचे स्थलांतर करण्यात आले. परिणामी, झाडाच्या आरोग्यावर परिणाम झाला. तथापि, झाडाच्या मुळांमधून नवीन अंकुर फुटू लागल्याने काही प्रमाणात सकारात्मक संकेत मिळत आहेत.हे झाड मरण पावले आहे हे स्पष्ट आहे, मात्र मुळांमधून नवीन अंकुर फुटत आहेत, याचा अर्थ त्याच्या काही भागांमध्ये जीवंतपणा आहे,असे डिसोझा यांनी सांगितले.

दोनच दिवसांपुर्वी पर्वरीहून गिरीला स्थलांतरित करण्यात आलेल्या दुसऱ्या वादग्रस्त वटवृक्षाच्या संदर्भात बोलताना देखील डिसोझा यांनी सरकारला इशारा दिला. ते म्हणाले की, हे झाड दीर्घकाळ टिकेल याची खात्री नाही, कारण ते सखल भागात लावले गेले आहे. झाडे स्थलांतरित करताना ती अधिक उंचीवर लावली गेली पाहिजेत, अन्यथा त्यांच्या अस्तित्वास धोका निर्माण होतो. त्यांनी सरकारला तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय झाडांचे स्थलांतर करू नये, असा सल्ला दिला. पर्यावरणीय तज्ज्ञ आणि योग्य यंत्रणा यांच्या मदतीनेच अशा मोठ्या झाडांचे स्थलांतर यशस्वी होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

गोवा ग्रीन ब्रिगेडचे संस्थापक आणि पर्यावरणवादी ॲव्हर्टिनो मिरांडा यांनीही वटवृक्षाच्या दुर्दैवी अवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की ,गोव्यात मोठ्या प्रमाणावर झाडांचे स्थलांतर झाले आहे, मात्र बहुतांश प्रयोग अपयशी ठरले आहेत. त्यामुळे वटवृक्षांसारख्या संवेदनशील झाडांचे स्थलांतर धोकादायक ठरते. पूर्वी हरमल आणि कळंगुट येथेही झाडांची अशीच अवस्था झाली होती,असे ते म्हणाले. त्यांनी सरकारवर गंभीर आरोप करत म्हटले की , ही प्रक्रिया झटपट राबवली गेली, जेणेकरून न्यायालयीन कारवाई टाळता येईल. सरकारला पर्यावरण संवर्धनाची अजिबात काळजी नाही. अशा मोठ्या वृक्षांमुळे जैवविविधतेला मोठा आधार मिळतो, मात्र सरकारने निसर्गाच्या या ठेव्याकडे दुर्लक्ष केले आहे. हे केवळ पर्यावरणाचे नुकसान नाही, तर गोव्याच्या पर्यटन क्षेत्रावरही विपरीत परिणाम होईल.

पर्यावरण कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या नावाखाली पर्यावरणाला हानी पोहोचवू नये. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखला पाहिजे. अन्यथा, भविष्यात याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील,असे कार्यकर्त्यांनी नमूद केले.

# आमदार खंडणी प्रकरण; एफआयआर रद्द

पणजी, दि. ४ : मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी ओडिशातील कुकेश रौता याच्यावरील खंडणीप्रकरणी नोंदवलेला एफआयआर रद्द केला. त्यांच्यावर हळदोणा मतदारसंघाचे आमदार ॲड. कार्लोस फेरेरा यांचा मॉर्फ केलेला अश्लील व्हिडिओ तयार करून खंडणी उकळल्याचा आरोप होता. न्यायालयाने एफआयआर रद्द करताना रौता याला १ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून, हा दंड १५ दिवसांत गोवा पोलिस कल्याण निधीत जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रौताला अटक केली होती. त्यांच्यावर आमदार फेरेरा यांचा चेहरा मॉर्फ करून अश्लील व्हिडिओ तयार केल्याचा आणि ५ लाख रुपये उकळल्याचा आरोप होता. याशिवाय, तब्बल ५ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचाही दावा करण्यात आला होता.

रौता याने न्यायालयात फौजदारी रिट याचिका दाखल करत तक्रारदार आमदार फेरेरा यांच्याशी आपसांत समझोता झाल्याचे सांगितले आणि एफआयआर रद्द करण्याची मागणी केली. त्यानुसार, वरिष्ठ वकील नितीन सरदेसाई यांनी युक्तिवाद करत एफआयआर रद्द करण्याची मागणी केली, ज्याला न्यायालयाने मान्यता दिली.

दोन्ही बाजूंनी प्रकरण मिटवले आहे, त्यामुळे पुढील तपासाला काहीही आधार राहात नाही. त्यामुळे दोषी ठरवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे वरिष्ठ वकील सरदेसाई यांनी सांगितले.

### एक लाखांचा दंड

तथापि, गुन्हे शाखेने याचिकेचा विरोध केला. पोलिसांच्या मते, या प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई झाली नाही, तर सामाजिक रचनेस धक्का बसेल आणि भविष्यात असे गुन्हे रोखण्यासाठी अडथळा निर्माण होईल. अखेर, न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून एफआयआर रद्द केला, मात्र याचिकाकर्त्याला १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. हा दंड गोवा पोलिस कल्याण निधीत १५ दिवसांत जमा करण्याचे निर्देशही दिले.

# वीज विभागाच्या कर्मचाऱ्याच्या अपघाती मृत्यूने संताप

रस्ता सुरक्षेचे तीन तेरा : दोषींवर कडक कारवाईची मागणी

टीम दैनिक हेराल्ड



वास्को, दि. ४ : दाबोळी येथे घडलेल्या अपघातात वीज विभागाच्या कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. विशाल मेगा मार्टजवळ रस्त्याच्या कडेला लावलेला लोखंडी बॅरिकेड अचानक कोसळून स्वप्नील चिंदरकर (३०, रा. सडा,मुरगाव ) यांना गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, स्टेशन ऑपरेटर म्हणून वीज विभागात काम करणारे स्वप्नील चिंदरकर सकाळची पाळी पूर्ण करून घरी परतत असताना ही दुर्घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, चिंदरकर आपल्या दुचाकीवरून परतत असताना रस्त्यानजीक काम करणाऱ्या एका जेसीबी ऑपरेटरने भले मोठे लोखंडी बॅरिकेड हलवून ते खाली फेकले, बॅरिकेड त्यांच्यावर कोसळले. घटनेनंतर संबंधित ऑपरेटर घटनास्थळावरून फरार झाला. घटनास्थळी जमा झालेल्या नागरिकांनी चिंदरक्र यांच्या अंगावर पडलेले लोखंडी बॅरिकेड बाजूला करण्याचा प्रयत्न केला. या बॅरिकेडचे वजन खूप असल्यामुळे ते बाजूला करण्यास तीन ते चार माणसे लागली , त्यानंतर त्यांना जवळच्या कॉटेज रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेमुळे वीज विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून, सार्वजनिक सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. विभागाच्या कर्मचाऱ्यांसह स्थानिक रहिवाशांनीही निष्काळजीपणाविरोधात आवाज उठवला असून, दोषींवर कठोर कारवाईसाठी प्रशासनाकडे मागणी केली आहे. दरम्यान, घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले असून, या निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या व्यक्तींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# गोव्यात आमदार पुत्र फरहान आझमीचा राडा ; गुन्हा दाखल

टीम दैनिक हेराल्ड



कळंगुट, दि. ४ : समाजवादी पार्टीचे नेते आणि मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार अबू आझमी हे औरंगजेबाच्या समर्थनावरून वादात सापडले असतानाच, आता त्यांचा मुलगा फरहान आझमी याने गोव्यात गोंधळ घातल्याची घटना समोर आली आहे. कळंगुट येथे इंडिकेटर न दाखवता कार वळविल्याने मोठा वाद निर्माण झाला. या प्रकरणी कळंगुट पोलिसांनी फरहान आझमी याच्यासह झिऑन फर्नांडिस, जोसेफ फर्नांडिस आणि श्याम यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. फरहान आझमी हा बॉलिवूड अभिनेत्री आयेशा टाकिया यांचा पती आहे.

प्राप्त माहितीनुसार, फरहान आझमी मर्सिडीज जी-वॅगन कारमधून कांदोळी भागातून जात असताना न्यूटन सुपरमार्केटजवळ इंडिकेटर न दाखवता वळण घेतले. या कारणावरून स्थानिकांमध्ये आझमी यांच्याशी वाद झाला. स्थानिकांनी त्याच्या कारभोवती गर्दी केली आणि मोठा गोंधळ उडाला. यादरम्यान, फरहान आझमीने त्याच्याकडे परवाना असलेली बंदूक असल्याचे सांगत धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे वाद अधिक चिघळला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत फरहान आझमी व त्याच्या सोबत असलेल्या काही जणांना ताब्यात घेतले. यावेळी स्थानिकांनी फरहान आझमीला पोलिसांच्या हवाली करण्यास प्रारंभी विरोध दर्शविला. मात्र, कळंगुट पोलीस स्थानकाचे उपनिरीक्षक परेश सिनारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १९५ आणि ३५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, मुंबईतही आमदार अबू आझमी यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. औरंगजेब आणि छत्रपती संभाजी महाराजांबद्दल वादग्रस्त विधान केल्यामुळे त्यांच्याविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ शिवसेना कार्यकर्त्यांनी तीव्र निदर्शने केली. त्यामुळे मुंबई पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९, ३०२ आणि ३५६ अंतर्गत अबू आझमी यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे.दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास सुरू आहे.

# सरपंच हत्या प्रकरणात बड्या मंत्र्यांचा राजीनामा

## महाराष्ट्रात राजकीय भूकंप : मंत्री धनंजय मुंडेना हटवले

**मुंबई, दि. ४ :** महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणानंतर राज्यात मोठा राजकीय गदारोळ निर्माण झाला आहे. या प्रकरणात अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव जोडल्यानंतर त्यांच्यावर राजीनाम्याचा दबाव वाढत गेला. अखेर, विरोधकांचा आणि जनतेचा दबाव वाढल्यानंतर धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला असून तो राज्यपालांनी स्वीकारला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला असून तो राज्यपालांकडे पाठवण्यात आला आहे. त्यांना पदमुक्त करण्यात आले आहे. या हत्येप्रकरणानंतर बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर बीडमध्ये बंद पुकारण्यात आला असून अनेक राजकीय नेत्यांनी या बंदला पाठिंबा दर्शवला आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी केली आहे.

या हत्याकांडानंतर काही धक्कादायक फोटो समोर आल्यानंतर राज्यभर संताप व्यक्त करण्यात आला. विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी दबाव वाढवला. सुरुवातीला मुंडे यांनी आपल्या हत्येप्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत राजीनामा देण्यास नकार दिला होता. मात्र, मुख्यमंत्र्यांनी कठोर भूमिका घेतली आणि अखेर मुंडेंना राजीनामा द्यावा लागला.

या प्रकरणाचा तपास सुरू असून गुन्हे अन्वेषण विभागाने दोषारोपपत्र बीड जिल्हा विशेष न्यायालयात सादर केले आहे. प्रमुख आरोपी म्हणून वाल्मिक कराडचे नाव समोर आले असून, खंडणी प्रकरणातून ही हत्या घडल्याचे आरोपपत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ मार्च रोजी होणार आहे.

संतोष देशमुख यांनी एका खंडणी प्रकरणात हस्तक्षेप केल्यामुळे त्यांची हत्या झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. देशमुख यांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांना ठार मारण्याचा कट रचला. हत्येपूर्वी त्यांना सातत्याने धमक्या दिल्या जात होत्या.

राजकीय वर्तुळात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू असून, मुख्यमंत्र्यांनी हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याची सूचना दिली आहे. राज्यभर या हत्येचा निषेध नोंदवला जात असून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी होत आहे.

# सिद्दिकी खान आरोपपत्र; न्यायालयाने तपास अहवाल मागवला

टीम दैनिक हेराल्ड



पणजी, दि. ४ : कुख्यात सिद्दिकी उर्फ सुलेमान खानविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे की नाही, तसेच पोलिसांना त्याच्या कोठडीची आवश्यकता आहे का, याबाबत उत्तर गोवा प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायालयाने म्हापसा पोलिस ठाण्याच्या तपास अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण तसेच तपशीलवार अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

२१ मार्च रोजी नियोजित सुनावणीसाठी सरकारी वकील एन. कलंगुटकर उपस्थित राहू शकले नाहीत, कारण त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याचे निधन झाले. परिणामी, ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली. दरम्यान, सरकारी वकील एस. मांद्रेकर यांनी न्यायालयाला कळवले की तपास अधिकाऱ्यांना पत्र पाठवण्यात आले असून अहवालाच्या प्रतीक्षेत आहेत.

सुलेमान खान यांच्या वतीने ॲड. राकेश नाईक यांनी न्यायालयात हजर राहून युक्तिवाद केला. २०२२ मध्ये म्हापसा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या जमीन हडपण्याच्या प्रकरणात विशेष तपास पथकाने (एसआयटी) खानविरुद्ध तिसरे आरोपपत्र दाखल केले आहे.

दरम्यान, पणजीतील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी मंगळवारी सुलेमान खान याला एसपी (गुन्हे) आणि इतरांवर हल्ला तसेच काही महत्त्वाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव टाकल्याच्या आरोपांबाबत त्यांचा जबाब नोंदवण्यासाठी समन्स जारी केले होते. यापूर्वी खान यांचा अंशतः जबाब नोंदवण्यात आला होता. मात्र, मंगळवारी त्याला न्यायालयात हजर करता आले नाही. त्यामुळे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी घेण्यात आल्याचे ॲड. नाईक यांनी न्यायालयासमोर स्पष्ट केले.

## निवडक

### सुशील कुमारला जामीन मंजूर

नवी दिल्ली, दि. ४ :
दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमार याला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सुशील कुमार ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती विजेता सागर धनखड याच्या हत्येप्रकरणी मे २०२१ पासून तिहार कारागृहात कैद आहे. न्यायाधीश संजीव नरुला यांनी आज सुशील कुमारला ५०,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. धनखड याच्या हत्येप्रकरणी मे २०२१ मध्ये कुस्तीपटू सुशील कुमारला अटक करण्यात आली होती. गुडघ्याच्या शस्त्रक्रियेसाठी त्याला यापूर्वीही एका आठवड्यासाठी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. ऑक्टोबर २०२२ मध्ये या प्रकरणात कुमार आणि इतर १७ जणांविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले होते.
सागर धनखड हत्याकांड प्रकरणात दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रानुसार, ऑलिंपिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमार आणि त्याच्या मित्रांना छत्रसाल स्टेडियमचा दरवाजा आतून बंद करून काठ्या, हॉकी आणि बेसबॉल स्टिकने ३० ते ४० मिनिटे मारहाण केली.

---------------

### पंजाबमध्ये पाक घुसखोर ठार

हरियाणा, दि. ४ : भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर तैनात असलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी एका पाकिस्तानी घुसखोराला ठार मारले. ही घटना बीओपी वाढाई चीमा चौकीजवळ घडली जेव्हा बीएसएफ जवानांना संशयास्पद हालचाली दिसल्या आणि त्यांनी घुसखोराला रोखण्याचा प्रयत्न केला.
बीएसएफच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एक अज्ञात व्यक्ती पाकिस्तानच्या बाजूने भारतीय सीमेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता. बीएसएफ जवानांनी त्याला प्रथम इशारा दिला, पण तो थांबला नाही आणि पुढे जात राहिला. यानंतर सैनिकांनी गोळीबार केला, ज्यामुळे घुसखोर जागीच ठार झाला. घटनेची माहिती मिळताच रामदास पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. घुसखोराजवळ कोणतेही ओळखपत्र सापडलेले नाही, त्यामुळे त्याची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही.

-------------

### सर्बियाच्या संसदेवर ग्रेनेडने हल्ला

बेलग्रेड, दि. ४ :
युरोपीय देश सर्बियाच्या संसदेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी मंगळवारी स्मोक ग्रेनेड फेकले. सरकारच्या धोरणांच्या निषेधार्थ आणि निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ विरोधी पक्षांनी हे निदर्शने केली. सर्बियन प्रोग्रेसिव्ह पार्टीच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी आघाडीने अधिवेशनाच्या अजेंड्याला मंजुरी देताच, काही विरोधी नेते त्यांच्या जागेवरून उठले आणि सभापतींच्या खुर्चीकडे धावले. त्यांनी सभागृहात स्मोक ग्रेनेड फेकले, ज्यामुळे सभागृह काळ्या धुराने भरले. यादरम्यान, त्यांची त्याच्या सुरक्षा रक्षकांशी झटापटही झाली. सर्बियन संसद मंगळवारी देशातील विद्यापीठांसाठी निधी वाढवण्यासाठी एक कायदा मंजूर करणार होती. यासोबतच पंतप्रधान मिलोस वुसेविक यांच्या राजीनाम्यावरही चर्चा होणार होती. परंतु सत्ताधारी आघाडीने मांडलेल्या अजेंड्यावरील इतर मुद्द्यांमुळे विरोधक संतप्त झाले. यानंतर हा गोंधळ झाला. या हल्ल्यात दोन खासदार जखमी झाले असून, त्यापैकी एक, जस्मिना ओब्राडोविक, यांची प्रकृती गंभीर असल्याचे स्पीकर ॲना ब्रनाबिक यांनी सांगितले.

### हवामान

कमाल : ३२ किमान : २५
आर्द्रता : ६५

### बाजार भाव

सोने : ₹ ८८,७२० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९८,००० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,९८९.९३↑ (९६.०१)
निफ्टी : २२,०८३.६५ ↑ (३६.६५)